



रयत शिक्षण संस्थेचे,

## राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग सन २०२१ -२२

दि.२३ एप्रिल २०२२

## 'मराठी विभाग अभ्यास सहल'

# अहवाल

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा व मराठी विभागाच्या वतीने विभागातील बीए भाग २ व भाग ३ या विधार्थ्यांची अभ्यास सहल शुक्रवार दिनांक २२/४/२०२२ रोजी शिवाजी विद्यापिठातील वि.स .खांडेकर स्मृतीसंग्रहालय या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या अभ्यास सहलीमध्ये मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक वि.स .खांडेकर यांच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या संग्रलयातील साहित्यिक वि.स .खांडेकर स्वत: वापरात असलेल्या संग्रहित वस्तूंची,साहित्यिक वि.स.खांडेकर यांच्या समग्र साहित्याची,त्यांना मिळालेल्या वेगवेगळ्या पुरस्कारांची माहिती मराठी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा .डॉ.सिंधू आवळे यांनी विधार्थ्यांना दिली.यावेळी स्मृतीसंग्रहालयाची पाहणी करीत असताना विधार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निरसन करण्यात आले.

त्यासोबत यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाला भेट देण्यात आली. मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रा .डॉ रणधीर शिंदे,प्रा.डॉ.नंदकुमार मोरे यांनी विध्यार्थ्यांशी संवाद साधला.अभ्यास सहलीसाठी मराठी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ. सिंधू आवळे,सहा.प्रा.डॉ. महेश रणदिवे, सहा.प्रा.अंकुश घुले सहभागी झाले होते.

**परिणाम/निष्पती**

- विद्यार्थ्यांना वि.स.खांडेकर यांच्याविषयी माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांना वि.स.खांडेकर लेखन साहित्याविषयी ज्ञान प्राप्त झाले.
- विद्यार्थ्यांना वाचनास व लेखनास प्रेरणा मिळाली.

**लाभार्थी**

**32**







RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.